# <u>रे. दिवाणी मुकदमा नं.८५/२०१८ मधील नि.६२ वरील आदेश</u>
## <u>(जालिंदर केरु सुर्यवंशी वि. राजू बाबूराव सुर्यवंशी वगैरे)</u>
## (**CNR**:**MHSN**12000665-2018)

वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं. ३ व प्रतिवादी नं. २७ यांचे वारस रेकॉर्ड आणणेसाठी झालेला विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

सदर कामातील प्रतिवादी नं. ३ शोभा आनंदराव पाटील ह्या दि. ०३/११/२०२१ रोजी कृष्णा हॉस्पीटल कराड येथे तसेच प्रतिवादी नं. २७ लक्ष्मण संभाजी सावंत हे दिनांक २६/०८/२०२० रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी नं. ३ व २७ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस वादी यांना विलंब झालेला आहे. सदर वादी यांना दाव्याचे कामी मुदतीत वारस रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. परंतु वादी यांना तांत्रिक कारणामुळे प्रतिवादी नं. ३ व २७ यांचे वारस रेकॉर्डवर वेळेत आणता आले नाहीत. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेस जाणूनबूजून विलंब केलेला नाही. सदर दाव्याचे कामी सदर दोन्ही प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलिंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे न झालेस वादी यांचे अपरिमित व पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहेच. त्यामुळे प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी वादीतर्फे वकीलांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं. १ ते १४ यांनी नि. ७३ ला त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये प्रतिवादींनी कथन केले की, वादीचा प्रस्तुत अर्ज त्यांना मान्य नसून वादीने प्रतिवादी नं. ३ व २७ यांचे वारस रेकॉर्ड घेणेस किती दिवसांचा विलंब झालेला आहे याचे योग्य कारण दिलेले नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित मे. कोर्ट वादीचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस वादीला र. रु. २०००/- इतका दंड करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर कामी जर वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत आला तर त्यांचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरचा अर्ज मंजूर झाला तर प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध

असणार आहे. त्याचप्रमाणे दाव्याच्या निराकरणासाठी त्याची मदत होणार आहे. याकामी वादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज प्रतिवादींना खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** वादीचा नि.६२ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी प्रतिवादी नं. ३ शोभा आनंदराव पाटील व प्रतिवादी नं. २७ लक्ष्मण संभाजी सावंत यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब र. रु. १०००/– प्रतिवादी यांना देणेच्या अटीवर माफ करण्यात येतो.

IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Digitally signed by IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2022.09.15 13:12:22 +05'30'

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**

**दिनांक–१४/०९/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 14/09/2022 |
| Signed by P. O. on | : | 14/09/2022 |
| Uploaded on | : | 15/09/2022 |